# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 30.05.2025** **वार- शुक्रवार**

---

**<u>एनडीए-महिलातुकडी</u>**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी अर्थात एन. डी. ए. मध्ये प्रशिक्षण पूर्ण करून भारतीय सैन्य दलात दाखल होणाऱ्या पहिल्या महिला तुकडीचा दीक्षांत संचलन सोहळा आज प्रबोधिनीच्या खेत्रपाल मैदानावर उत्साहात पार पडला. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४८ व्या तुकडीचा हा दीक्षांत संचलन सोहळा ऐतिहासिक ठरला, त्याला कारणही तसंच होतं. गेल्या ७५ वर्षात प्रथमच महिला अधिकाऱ्यांची तुकडी लष्करात अधिकारी पदावर रुजू होण्यासाठी सज्ज झाली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मिझोरामचे राज्यपाल आणि माजी लष्कर प्रमुख व्हि के सिंग, प्रबोधिनीचे कमांडंट व्हाइस ॲडमिरल गुरुचरण सिंग उपस्थित होते.

यावेळी, प्रिन्स राज याला राष्ट्रपती सुवर्ण पदक, उदयवीर सिंग नेगी याला रौप्य पदक तर तेजस भट यांना कास्य पदक प्रदान करण्यात आलं. चीफ ऑफ स्टाफ बॅनरचा मान गोल्फ स्कॉर्डनला मिळाला. पहिल्यांदाच महिला तुकडी प्रशिक्षण पूर्ण करत आहे ही देशासाठी अभिमानाची गोष्ट आहे. आगामी काळात, नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून त्यानुसार रणनीती आखावी लागेल, असं मिझोरामचे राज्यपाल व्ही. के. सिंग याप्रसंगी बोलताना म्हणाले.

**मुख्यमंत्री-अहिल्याबाईहोळकरजयंती**

समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत विकासाची गंगा पोहोचवत प्रांत समृद्ध करणाऱ्या लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे विचार आज प्रेरणादायी असून त्यांची धोरणं आजच्या काळातही लागू होतात असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात केलं. यांच्या त्रिजन्मशताब्दी वर्षानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्यावतीनं आयोजित युवा प्रेरणा संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उच्च तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार हेमंत रासने उपस्थित होते. याप्रसंगी युवा मोर्चाच्या काही महिला कार्यकर्त्यांच्या सत्कार करण्यात आला

**कृषि हॅकेथॉन**

महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाच्या वतीने येत्या १ ते ३ जून दरम्यान पुण्यात कृषि महाविद्यालयाच्या मैदानावर पहिलं आंतरराष्ट्रीय कृषि हॅकेथॉन आयोजित करण्यात आला आहे. तीन दिवसांच्या या कार्यक्रमात कृषि तंत्रज्ञ, वैज्ञानिक, या क्षेत्रातील स्टार्ट अप चालवणारे तरुण उद्योजक, शासकीय अधिकारी मिळून संवाद साधणार आहेत तसच कृषि क्षेत्रातील अनेक समस्यांवर उपाय शोधण्याचा प्रयत्न करणार आहेत. या हॅकेथॉनमध्ये ८ कृषि विषयक विभागासाठी स्पर्धा होणार असून १६ जणांची अंतिम निवड करण्यात येणार आहे.

**पुणे-कोरोना**

गेल्या काही दिवसांपासून पुणे शहरात कोरोनाबाधित रुग्ण आढळून येत आहेत. या रुग्णांच्या उपचार पद्धतीबाबत आरोग्य विभागाने नवीन मार्गदर्शक तत्त्व जारी केली आहेत. यानुसार, रुग्णांची स्थिती, वयोगट आणि ऑक्सिजन पातळीच्या आधारे उपचारात बदल करण्यात आले आहेत. तसंच सहव्याधी असलेल्या आणि रुग्णालयात भरती झालेल्या कोरोना रुग्णांना तीन ते पाच दिवस रेमडेसिव्हीर औषध वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कोरोनाविरुद्ध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्यासाठी

आज पुणे महानगर पालिकेत आरोग्य प्रमुख डॉ. निना बोराडे यांच्या अध्यक्षतेखालील समितीची आढावा बैठक झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या.

**<u>मनपानिवडणूक-चंद्रकांतपाटील</u>**

पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी आतापासूनच तयारीला लागण्याच्या सूचना राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आज पुण्यात दिल्या. चंद्रकांत पाटील यांनी आज कसबा विधानसभा मतदारसंघाचा दौरा करून, नवनियुक्त मंडल अध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घेतल्या, त्यावेळी ते बोलत होते.

**<u>मनशक्तीकेंद्र-सुवर्महोत्सव</u>**

बुध्दीसह मनावर देखील संस्कार आणि प्रयोग होणे आवश्यक आहे. कारण मन हे कुरूक्षेत्र आणि शांतीचंही अधिष्ठान असल्याचं मत ज्येष्ठ आध्यात्मिक गुरु गोविंद देव गिरिजी महाराज यांनी व्यक्त केलं. लोणावळा येथील मनशक्ती प्रयोग केंदाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या उद्घाटन सोहळ्यात ते काल बोलत होते. गोविंद देव गिरिजी महाराज यांच्या हस्ते संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या बोधचिन्हाचं अनावरण करण्यात आलं.

**<u>गतिरोधक</u>**

पुणे शहरात रस्त्यांवर पोलिसांच ना हरकत पत्र असल्याशिवाय गतिरोधक बसवू नयेत, असे आदेश पुणे महापालिकेच्या पथ विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी दिले आहेत. शहरातील विविध रस्त्यांवर गरज नसतानाही गतिरोधक केले गेल्याचं आढळून आलं असून त्यामुळे अनेकदा अपघात घडतात, या पार्श्वभूमीवर हा आदेश देण्यात आला आहे.

**<u>उत्पन्नदाखले</u>**

गरीब रुग्णांना उपचार घेण्यासाठी तसंच विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी उत्पन्नाचे दाखले महत्वपूर्ण असतात. मात्र ते देण्यात तहसील कार्यालयात दिरंगाई होत असल्याचं आढळून आलं आहे. हे दाखले त्वरित दिले जावेत, या मागणीसाठी आज मामलेदार कचेरीसमोर रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आलं.

**फुटबॉल**

पुणे जिल्हा फुटबॉल संघटनेच्या मान्यतेने अपोलो हॉटफुट करंडक’ युवा साखळी फुटबॉल स्पर्धा नुकतीच पार पडली. 9 वर्षाखालील गटात, 'फोर लायन्स् फुटबॉल ॲकॅडमी 'अ' संघाने जेतेपद पटकावले. तर 13 वर्षाखालील गटात स्टेपओव्हर फुटबॉल ॲकॅडमीने अजिंक्य पद पटकावले.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल ३३ आणि किमान २३ अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली. उद्या संध्याकाळी आकाश अंशतः ढगाळ राहून हलक्या स्वरूपाचा पाउस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतासह, नमस्कार.**